# स्त्रीभ्रुण हत्या कारणे आणि उपाय योजना

कु.एस. वाय. लखदिवे,
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख,
इंदिरा महाविद्यालय, कळंब.जि. यवतमाळ

स्त्री आणि पुरूष ही समाज रथाची दोन चाके आहेत. स्त्री मध्ये प्रजननसंस्था हा पुरूषांपेक्षा वेगळा व समाजाचे सातत्य अबाधित टिकविणारा गुण आहे. लैगिंग गटात ही मानवाची एक नैसर्गिक अनिवार्य गरज आहे. या गरजपूर्तीतूनच नवीन जीव उत्पन्न होतो. वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी समाजाने हम दो हमारे दो या विचारसरणी स्विकार केला. परंतु दोन अपत्यांमध्ये एक मुलगा असावा, त्यातल्या त्यात दोन्ही मुले असतील तर सोन्याहून पिवळे ही भावना प्रचलित झाली. ज्यांना एकच मूल ठेवावयाचे आहे त्यांना मुलगाच असावा असे प्रकर्षाने वाटते.

"जन्माला येण्यापूर्वी गर्भातच कन्येची हत्या करणे म्हणजे स्त्री भ्रूणहत्या" होय. स्त्रिला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार भारतीय समाजाने आजवर नाकारला होता. परंतु आज स्त्रिला जन्माला येण्याचा अधिकार समाज कन्याभ्रूणहत्येमुळे नाकारत आहे. विज्ञानयुग निश्चितच परिवर्तनशील युग आहे. परंतु या वैज्ञानिक शोधाचा दुरूपयोग झाला तर तो अभिशाप ठरतो. यातील एक अमानवीय कूरकृत्य म्हणजे जन्माआधीच गर्भात स्त्रि लिंगाची हत्या करणे होय. विज्ञानामुळे वैद्यकीय क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा परिणाम 'गर्भजल चिकित्सा' सुलभ झाली. त्याचा दुरूपयोग स्त्री भ्रूणहत्येसाठी होवू लागला. देशात 1994 व महाराष्ट्रात 2003 मध्ये लिंगभेद चाचणी वर बंदी घालण्याचा कायदा झाल्यानंतरही कायदा व बंदी झुगारून गर्भजल परिक्षेव्दारे मुलींचा गर्भ नष्ट करण्याचे प्रकार सर्रास चालू आहे. ही समस्या आता गंभीर होत चालली आहे.

खोड समाजामध्ये अशी समजूत होती की कुटूंबात एकदा जन्म घेतलेली आत्मा पुन्हा पुन्हा त्याच कुटूंबात जन्म घेते. जन्माच्या तिस–या दिवशीचे संस्कार नवजात अर्भकावर झाले की मग त्या अर्भकाचा आत्मा कायम त्या कुटूंबाशी बांधला जातो, म्हणून नको असलेली मुलगी जन्माला आल्यावर तिच्यावर संस्कार होण्याअगोदर मारून टाकले तर त्या मुलीचा आत्मा कायमचाच त्या कुटूंबातून हद्दपार होतो असा समाज होता. मुलगी नको म्हणजे एका जन्मापुरती नव्हे? तर भविष्यातूनही तिचे अस्तित्व पुसून टाकण्याची ही वृत्ती प्रत्यक्ष बालहत्येपेक्षाही कूर वाटते.

**स्त्री भ्रूणहत्येची कारणे :–**

1. **पितृसत्ताक कुटूंबपध्दती**
2. **मुलीविषयी तिरस्कार**
3. **मुलगा म्हणजे वंशाचा दिवा ही मानसिकता**
4. **स्त्रीचे समाजात असणारे दुयम स्थान**
5. **अशिक्षितपणा व अज्ञान**
6. **स्त्रियांच्या क्षमतेबाबत समाजाची पूर्वग्रहदूषित धारणा**
7. **लिंग परिक्षण करून स्त्री–भ्रूणहत्या**
8. **स्त्रियांची सोशिक वृत्ती**
9. **सोनोग्राफी सेंटरचा वाढता प्रसार**
10. **सामाजिक असुरक्षितता व आर्थिकदृष्ट्या परावलंबित्व**
11. **समाजातील रूढी, परंपरा उदा. हुंडा पध्दत, कन्यादान पध्दत**

**1 पितृसत्ताक कुटूंबपध्दती :–**

हजारो वर्षापासून भारतात पितृसत्ताक कुटूंब पध्दती असल्यामुळे अपत्यप्राप्तीच्या वेळी मुलींच्या तुलनेत मुलगा होण्याची अपेक्षा केली जाते. व त्यात अग्रक्रम दिला जातो. भारतीय समाजातील प्राचिन रूढी प्रथा–परंपरा व मूल्यांमुळे मुलगा वंशाचादिवा, कुटूंबाचा आधर, म्हातारपणाची काठी, व मोक्षप्राप्ती इत्यादी कारणांचा आधार घेतला जातो.

**2 मुलीविषयी तिरस्कार :–**

भारतीय समाजात मुलगी जन्माला येणे दुःखद घटना मानली जाते. मुलगी ही दुस–याचे धन आहे. कितीही शिकविले तरी दुस–यांच्याच घरी जाते असे मत आहे.

**3 मुलगा म्हणजे वंशाचा दिवा :–**

मुलामुळे आपले नाव चालते. वृध्दापकाळाचा आधार आहे व वंशाचा तो दिवा आहे असे सर्वांना वाटते. त्यामुळे सर्वांनाच मुलगा पाहिजे असतो. त्यामुळे गर्भजल परिक्षण करून मुलीचा गर्भ नष्ट केला जातो.

**4 स्त्रीचे समाजात असणारे दुयम स्थान :–**

समाजामध्ये पितृसत्ताक कुटूंबपध्दती अस्तित्वात असल्यामुळे स्त्रीला नेहमी दुय्यम स्थान मिळाले. तिला समाजात कनिष्ठ मानल्या गेले. स्त्रिया हक्क व अधिकारापासून वंचित ठेवल्या गेली. स्त्री म्हणजे परक्याचे धन, पायातील वहाण असे मानणारे समाजात आहे.



Scanned with ACE Scanner

5 **अशिक्षीतपणा व अज्ञान :–**

समाजाने दिलेल्या दुय्यम स्थानामुळे स्त्रिला शिक्षणापासून वंचित ठेवल्या गेले. तिचे अज्ञान वाढत गेले व यामुळे आंणखीनच तिला हीण दर्जाची वागणूक दिल्या गेली.

6 **स्त्रियांच्या क्षमतेबाबत समाजाची पूर्वग्रहदूषित धारणा :–**

अशिक्षितपणा व अज्ञानामुळे तिच्याजवळ काहीच क्षमता नाही. सर्व अत्याचार निमूटपणे सहन करते त्यामुळे ती घाबरट आहे. तिच्यात काहीच करण्याची क्षमता नाही असा समाजाने पूर्वग्रह केला आहे.

7 **लिंग परिक्षण करून स्त्री–भ्रूणहत्या :–**

1977 अधिनियम गर्भपात करण्यासाठी चे पूर्ण कडक नियम शिथिल करण्यात आले व त्यामुळे गर्भजल चाचणी करून स्त्रीचा गर्भ असल्यास गर्भपात करणा–यांचे प्रमाण वाढले.

8 **स्त्रियांची सोशिक वृत्ती :–**

समाजाने जे दुय्यम स्थान स्त्रिला सुरूवातीपासून दिले त्यामुळे तिला पायातील वाहण, कोप–यातील केरसूणी असे माणण्यात आले. पुरूषाने कमावून आणायचे व स्त्रिने घरातील कामे करायची अशी समाज रचनाच होती. त्यामुळे पुरूषाने कोणत्याही प्रकारे तिच्यावर अत्याचार केले तरी ती सहन करत आली व तिची ही सहनशिलता व सोशिक वृत्तीच तिच्या प्रगतीच्या आड आली.

9 **सोनोग्राफी सेंटरचा वाढता प्रसार :–**

वैज्ञानिक प्रगतीमुळे अनेक फायदे होत असले तरी त्यापासून काही तोटे पण आहेत? सोनोग्राफीचा उपयोग गर्भाची हालचाल व वाढ पाहण्यासाठी केला जायचा तर त्याचा गर्भ कोण्ता आहे हे पाहण्याकरिता केला जावू लागला व याकरिता या सेंटरची भरपूर प्रमाणात वाढ झाली.

10 **सामाजिक असुरक्षितता व आर्थिकदृष्ट्या परावलंबित्व :–**

भारतीय स्त्रिया पिढ्यानपिढ्या कोणावर तरी अवलंबून राहात होत्या. बलात्कार, हुंडाबळी, सतीप्रथा या गोष्टीमुळे स्त्रि असुरक्षित होती व पैसा कमविणे हे केवळ पुरूषाचेच काम स्त्रीचे नाही ही भावना तिच्या मनात भरविल्या जाते.

11 **समाजातील रूढी, परंपरा उदा. हुंडा पध्दत :–**

मुलगा हा वंशाचा दिवा आहे व मुलगी ही परक्याचे धन आहे ही पध्दत आपल्या समाजात रूढ झाली आहे. मुलगी झाल्याबरोबर तिच्यासाठी हुंड्याची रक्कम जमा करावी लागते असे सर्व समजतात त्यामुळे मुलीला शिक्षण पण चांगल्या पध्दतीचे घेउ दिल्या जात नाही. मुलगा हा पैसा आणतो व मुलगी ही खर्च लावते असा समज झालेला आहे. गरीबीमुळे आईवडील हुंडा देउ शकत नाही त्यामुळे मुलगी झाली की तिला मारून टाकण्यापर्यंत मजल जाते.

स्त्री भ्रूणहत्येवर आळा घालण्यासाठी उपाययोजना

1 गर्भजल परीक्षण बंदी कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे.
2 डॉक्टरांनी गर्भजल परीक्षेवर आलेल्या बंदीचे प्रभावीपणे पालन करणे.
3 अवैधपणे चालणा–या गर्भपात व गर्भजल परीक्षण क्लिनीक्सवर अचानक धाडी टाकून दोषींवर कारवाई करणे.
4 कन्या जन्माला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने विशेष पारितोषीक योजना राबविणे.
5 स्त्रियांमध्ये स्त्रीगर्भ विकसीत करण्याविषयी शासकीय व सामाजिक स्तरावर जनजागृती मोहिम राबविणे.
6 पुरूषांना कन्या हत्येमुळे होणा–या दुष्परिणामाविषयी जागृत करणे.
7 'कन्या भ्रूणहत्येचे दुष्परिणाम' या विषयावर मोठ्या प्रमाणात व्याख्यानाचे आयोजन करणे.
8 कन्यारत्नाला प्रोत्साहन देणा–या साहित्याची निर्मिती करणे.
9 कन्या भ्रूणहत्येला स्त्रीयांनी विरोध करणे.
10 स्त्री शिक्षण व स्त्री व्यक्तीमत्व विकासाला प्रोत्साहन मिळेल असे उपकम राबविणे.
11 मुलगी पण वंशाचा दिवा ही मानसिकता निर्माण करणे.
12 लेक लाडकी अभियान राबविणे.
13 सामाजिक, धार्मिक संस्थांचा पुढाकार

सध्या महाराष्ट्रात बीड, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील स्त्री भ्रूणहत्येची प्रकरणे राज्यभर गाजत आहे. स्त्री भ्रूणहत्या ही समाजाला लागलेली एक कीड आहे. ह्या सामाजिक कुप्रथेचा अंत करण्यासाठी आणि समाजातील लोकांचा दृष्टीकोन बदलण्यासाठी अनेक सामाजिक संघटना कार्यरत आहेत. सरकारनेही याबाबत पुढाकार घेत पुष्कळसे कायदे केले आहे. व त्या कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. जसे

1. हुंडा विरोधी कायदे– हुंडा निषेध अधिनियम 1961.
2. लिंग परिक्षण विरोधी कायदे– च्च्छक्ज्अधिनियम
3. कन्या प्रशिक्षण प्रोत्साहन कायदे.



Scanned with ACE Scanner

4. स्त्री अधिकार / हक्क अनुमोदन कायदे.
5. कन्यासाठी संपत्तीमध्ये समान अनुमोदन कायदे.

पण फक्त सरकारने कायदे बनवूनच चालणार नाही तर आपल्यापैकी प्रत्येकाला स्त्री भूण्हत्येच्या विरोधात लढा द्यायला हवा. फक्त 'लेक वाचवा,' 'मुलगी शिकली प्रगती झाली' असे स्लोगन करून चालणार नाही तर समाजाची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न प्रत्येक नागरिकाने करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ**

सकाळ वृत्तपत्र दि. 16/2/2010
समाज प्रबोधन पत्रिका अंक – 181 पाने – मार्च 2008
'स्त्री भ्रूणीहत्येचे आव्हान'
लेख देशोन्नती रविवार 20 ऑगष्ट' 2006 ' डॉ. सिमा साखरे.

.................................



Scanned with ACE Scanner